## थोडक्यात



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शनिवारी पुणे येथील ऐतिहासिक शनिवार वाड्याला भेट देऊन राष्ट्रीय संरक्षित स्मारक असलेल्या वास्तूची पाहणी केली.

### ■ आदिती तटकरे यांच्या हस्ते साहित्य वाटप

अलिबाग - पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी एसओएस बालग्राम सोगाव अलिबाग येथे भेट देऊन तेथील निराधार, आई-वडील नसलेल्या बालकांना स्वातंत्र्यदिनानिमित्त शालेय साहित्य वाटप केले. या बालग्राम मध्ये १५% विद्यार्थी आहेत. यावेळी पालकमंत्री महोदयांनी येथील बालकांची आस्थेने विचारपूस करुन त्यांना व उपस्थित कर्मचाऱ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी तहसिलदार सचिन शेजाळ, संस्थेचे संचालक राकेश सिन्हा, सहाय्यक संचालक शिवरुद्र लुपने, व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### ■ पवईत कोरोना योध्दांच्या हस्ते ध्वजारोहण

मुंबई- कोरोना महामारीमध्ये नागरिकांच्या सुविधेसाठी झटणाऱ्या कोरोनायोद्ध्यांप्रती कृतज्ञता म्हणून यंदा स्वातंत्र्यदिनी पवईमध्ये झालेल्या कार्यक्रमात कोरोनायोद्ध्यांना ध्वजारोहण करण्याचा मान मिळाला आहे. सुपर आपतकालिन दूत असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमामध्ये कोरोनायोद्धे असणाऱ्या डॉक्टर, पोलीस, सफाई कर्मचारी यांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आले आहे. पवई च्या चैतन्य नगर येथे झालेल्या या कार्यक्रमात अनेक मान्यवर पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### ■ टिळक स्मारकासमोर ध्वजारोहण

मुंबई- स्वराज्यभूमि (गिरगाव चौपाटी ) येथिल लोकमान्य टिळकांच्या स्मारका समोर झी २४ तासचे संपादक आशिष जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. त्यानंतर लोकमान्यांना पुष्पांजली वाहण्यात आली. प्रतिवर्षी स्वातंत्र्य दिनी पत्रकार वा साहित्यिकांना लोकमान्य टिळक स्वराज्यभूमी स्मारक समितीतर्फे आमंत्रित केले जाते . स्थानिक खासदार अरविंद सावंत , मुंबईचे माजी नगरपाल जगन्नाथराव हेगडे, शिवसेना दक्षिण मुंबई विभाग प्रमुख पांडुरंग सकपाळ , स्वराज्यभूमी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सिलम, नंदकुमार मादुस्कर, दिलीप महेश्वरी, नगरपालिकेचे उप प्रमुख सुरक्षा अधिकारी विलास सुर्वे, सुशिल बडेकर , किरण सुंका, सतिष भिडे , चंद्रशेखर गंटोला, संतोष गाजुल, हर्ष मदन, मधु कुमार आदी उपस्थित होते.

### ■ ई-स्काय क्लिनिकचे लोकार्पण

लासलगाव- करोना साथरोग काळामध्ये मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा रुग्णालय व जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पॉझिटिव्ह व गंभीर रुग्णांवर क्लाऊड फिजिशियनद्वारे रुग्णांचे मॉनेटरिंग करून ई स्काय क्लिनिकचे लोकार्पण करण्यात आले. करोना काळात नागरिकांची व रुग्णांची मानसिकता सकारात्मक राहण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत ई साय क्लिनीकद्वारे समुपदेशन करण्याचा उपक्रमाचा शुभारंभदेखील पालकमंत्री यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आला आहे.

### ■ ऑपरेशन सेंटर बनले लोकचळवळ

लासलगाव- जिल्ह्यात करोना संकटाची परिस्थिती लक्षात घेवून जिल्हा आपत्ती निवारण प्राधिकरण व जिल्हा प्रशासनामार्फत इमर्जंन्सी ऑपरेशन सेंटरची स्थापना करण्यात आली होती. गेल्या पाच महिन्यात या इमर्जन्सी ऑपरेशन सेंटरने केवळ सर्व प्रशासकीय यंत्रणेलाच नाही तर जिल्ह्यातील अनेक सेवाभावी संस्था, सामाजसेवक, उद्योग, धार्मिक संस्था यांना एका सांध्यात जोडून आपत्ती निवारणाच्या कामाला लोकाभिमुख चेहरा प्राप्त करून दिला आहे. इमर्जन्सी ऑपरेशन सेंटरच्या माध्यमातून शासकीय व प्रशासकीय मदतीचा प्रवाह एक लोक चळवळ बनला असल्याचे पालकमंत्री भुजबळ यांनी सांगितले.

### ■ तालीम २चे टीझर पोस्टर प्रदर्शित

मुंबई - करूणावी क्रिएटरची निर्मिती तसेच दिग्दर्शक नितीन रोकडे यांच्या आगामी तालीम २ या चित्रपटाचा टीझर पोस्टर सोशल मीडियावर नुकताच लाँच करण्यात आला. अनेक हिंदी आणि मराठी चित्रपटाचे संकलन करणा-या नितीन रोकडे यांनी यापूर्वा तालीम' चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. तालीममधून कुस्तीसारख्या लोकप्रिय मैदानी खेळाला रूपेरी पडद्यावर यशस्वीपणे मांडणा-या नितीन रोकडे यांच्या तालीम २' मध्ये आपल्या देशासाठी असणारी सुवर्ण पदकाची शर्यत पाहायला मिळणार आहे.या चित्रपटाची कथा नितीन रोकडे यांची असून पटकथा संदिप कुमार रॉय, मधुलिता दास आणि नितीन रोकडे यांची आहे. चित्रपटाचे संवाद जय अत्रे, डॉ. अरूण मिरजकर यांचे असून फारूख खान छायाचित्रणाची जबाबदारी पार पाडणार आहेत. प्रफुल्ल-स्वप्नील या चित्रपटातील गीतांना संगीतबद्ध करणार असून बी.आर. नवीन कुमार साऊंड डिझाइन करणार आहेत. नृत्यदिग्दर्शन रंजू वर्गिस यांचे असून प्रतिक बागडे सहदिग्दर्शन करणार आहेत.

# आदित्य ठाकरे यांच्या हस्ते कोविड योद्ध्यांचा सन्मान

**प्रतिनिधी**

मुंबई, शनिवार - वांद्रे येथील मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आज स्वातंत्र्यदिनसाजरा करण्यात आला. जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहणकरण्यात आले. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या कोविडयोद्ध्यांचा पालकमंत्री ठाकरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी उत्कृष्ट महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

पालकमंत्री ठाकरे यावेळी म्हणाले की, कोविड योद्ध्यांच्या आभारासाठीमाझ्याकडे शब्द नाहीत.



डॉक्टर, नर्सेस, इतर आरोग्य कर्मचारी, पोलीस, महापालिका कर्मचारी, सफाई कामगार अशा विविध योद्ध्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळेच मुंबईमध्ये आपणकोविडवर नियंत्रण प्राप्त करू शकलो. हा लढा कोविडपासून स्वातंत्र्य मिळवण्याचा आहे. मला खात्रीआहे की ही लढाई सुद्धा आपण नक्कीच जिंकू. पण ही लढाई अजून संपलेली नसून लोकांनीयापुढील काळातही कोरोना रोखण्यासाठी आवश्यक काळजी घेणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. पालकमंत्री ठाकरे यांनी सर्वांना स्वातंत्र्यदिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या.

कोरोनामुक्तीसाठी कार्य करणारे सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिमा खांडावाला, डॉ. ज्योती दराडे, डॉ. हरिता सावे, ट्रामा केअर हॉस्पीटलच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. विद्या माने,सेव्हन हिल्स हॉस्पीटलचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. महारुद्र कुंभार, सहायक महापालिकाआयुक्त किशोर गांधी, संतोष दोंडे, अजित अंबी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत माने, पोलीसनिरीक्षक संजय चव्हाण, पोलीस निरीक्षक झुबेदा शेख यांना सन्मानित करण्यात आले.

# चेंबूर येथील बेघर ३१० लोकांचे आज मातोश्रीवर साकडे

**प्रतिनिधी**

मुंबई, शनिवार - मागील ५ वर्षा पासून एस आर ए योजनेत बेघर राहिलेल्या ३१० झोपडीवासीयांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मागील दिड वर्षा पासून पंचशील नगर अमर महाल चेंबूर येथे साखळी उपोषण चाललेले असून मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे यांचे लक्ष वेधण्यासाठी आपल्या हक्काच्या घरासाठी उद्या सकाळी १० वाजता मातोश्री या मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानी मोर्चाचे आयोजन केले आहे.

दी बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे कार्याध्यक्ष महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर से स्वतः या मोर्चाचे नेतृत्व करणार असून भीम आर्मी सह विविध संस्था संघटनांनी या मोर्चाला पाठींबा दिला आहे. तरीही या हक्काच्या मागणीला पाठींबा देण्यासाठी मोठ्या संख्येने मातोश्री येथे उद्या सकाळी १० वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन सांजकर यांनी केले आहे.

# २०१८च्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना पोलिस सेवेत घ्या!

**प्रतिनिधी**

मुंबई, शनिवार - पोलिस शिपाई भरती प्रक्रिया उमेदवारांनी पूर्ण केली असून त्यांची नावे २०१८ पासून प्रतीक्षा यादीत आहेत. सध्या कोरोनाच्या महामारीत पोलिस हे खुप महत्वाची जबाबदारी पार पाडत आहेत. पोलिसांचा कामाचा ताण कमी करण्यासाठी प्रतीक्षा यादीमध्ये असणाऱ्या उमेदवारांना सामाऊन घेणे गरजेचे आहे. शिवाय २०१८ पासून नविन पोलिस भरती झालेली नाही. त्यामुळे आता त्यांचे वय संपून गेले असल्याने भविष्यात होणाऱ्या पोलिस भरतीत पात्र असणार नाही. त्यामुळे शासनाने प्रतीक्षा यादीत असणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच शासनावर येणारा आर्थिक ताण लक्षात घेता सदर सर्व प्रतीक्षा यादीमध्ये असणारे उमेदवार एक वर्ष विना वेतन सेवा करायला तयार आहेत. उमेदवारांचे भविष्य उध्वस्त होणार नाही याची काळजी सरकारने घेऊन पोलिस शिपाई भरती २०१८ मधील प्रतीक्षा यादीत असलेल्या उमेदवारांना पोलिस सेवेत सामाऊन घ्यावे अशी मागणी अभिषेक सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा सुनीता नागरे यांनी मुख्यमंत्री यांना ईमेल द्वारे केली आहे.

महाराष्ट्राचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पहिल्यांदा घोषणा केली की, राज्यात ८००० पोलिस शिपाई यांची भरती करण्यात येईल.त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ७ जुलैला राज्यात १०००० पोलिस शिपाई यांची भरती करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. गृहमंत्री अनिल देशमुख यांनी राज्याचे पोलिस महासंचालक, गृह विभागाचे सचिव व संबंधित विभागाच्या व्यक्तींशी एक बैठक घेऊन राज्यात डिसेंबर २०२० अखेर १२५३८ पोलिस भरती पूर्ण करण्यात येईल असे जाहिर केले होते. पण सध्या या कोरोनाच्या महामारीत पोलिस भरती प्रक्रिया राबविणे शक्य नसून कोरोना कधी संपणार हे कोणाला ही माहिती नाही असे ही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. सदर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांनी नुकतीच सुनीता नागरे यांची भेट घेऊन सदर प्रकरणी निवेदन दिल्याचे त्यांनी सांगितले.

# रानभाज्यांना शहरी भागात बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणार!

**वार्ताहर**

**पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांचे आश्वासन**

अलिबाग, दि. १५ - ग्रामीण आदिवासी भागात असलेल्या रानभाज्या ह्या आरोग्याला अत्यंत उपयुक्त व पोषण मूल्य असलेल्या असून त्या नामशेष होऊ नयेत आणि आदिवासी कुटुंबांना आर्थिक लाभ व्हावा, म्हणून शासनाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहा येथे आयोजित रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते आज संपन्न झाले.

या महोत्सवामध्ये जिल्ह्यातील ५२ हून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये महिलांचा विशेष सहभाग होता. पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी यावेळी सूचित केले की, या रानभाज्यांना शहरी भागात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असून त्यादृष्टीने जागा उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकारचा उपक्रम स्वागतार्ह असून या उपक्रमास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळेल, असा विश्वास व्यक्त करुन सर्व महिला शेतकऱ्यांचे आणि त्याचबरोबर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचेही प्रोत्साहन म्हणून कौतुक केले. या उद्घाटन प्रसंगी पंचायत समिती सभापती सौ.गुलाब धर्मा वाघमारे, उपसभापती श्री. रामचंद्र सकपाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पांडुरंग शेळके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.आर्ले, प्रकल्प उपसंचालक सिताराम कोलते, सतीश बोराडे, कृषी विकास अधिकारी श्री.लक्ष्मण खुरकुटे, कृषी उपसंचालक दत्तात्रय काळभोर, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, रोहा तहसिलदार कविता जाधव, गटविकास अधिकारी जयेंद्र जाधव, तालुका कृषी अधिकारी कुमार जाधव, कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि मधुकर पाटील, अमित उकडे,, आदिवासी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## पश्चिम रेल्वे अहमदाबाद आणि वडोदरा येथून कुडाळ, सावंतवाडी रोड आणि रत्नागिरी करिता तीन गणपती विशेष गाड्यांच्या १२ फेऱ्या चालविणार आहे

वसई रोड मार्गे

### अहमदाबाद ⇌ कुडाळ — ४ फेऱ्या

साप्ताहिक दि. १८ ते २६ ऑगस्ट २०२० पर्यंत

| ट्रेन क्र. | प्रस्थान | आगमन | प्रस्थानाचा दिवस आणि दिनांक |
|---|---|---|---|
| ०९४१६ | अहमदाबाद ०९.३० वा. | कुडाळ ०४.३० वा. (पुढील दिवशी) | प्रत्येक मंगळवार १८ आणि २५ ऑगस्ट, २०२० |
| ०९४१५ | कुडाळ ०५.३० वा. | अहमदाबाद ००.१५ वा. (पुढील दिवशी) | प्रत्येक बुधवार १९ आणि २६ ऑगस्ट, २०२० |

**थांबे:** वडोदरा, सुरत, वापी, **वसई रोड**, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली आणि सिंधुदूर्ग स्थानक

**संरचना:** एसी २-टीयर, एसी ३-टीयर, शयनश्रेणी आणि द्वितीय श्रेणी आसन

### वडोदरा ⇌ रत्नागिरी — ४ फेऱ्या

साप्ताहिक दि. २३ ते ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत

| ट्रेन क्र. | प्रस्थान | आगमन | प्रस्थानाचा दिवस आणि दिनांक |
|---|---|---|---|
| ०९१०६ | वडोदरा १५.२० वा. | रत्नागिरी ०५.३० वा. (पुढील दिवशी) | प्रत्येक रविवार २३ आणि ३० ऑगस्ट, २०२० |
| ०९१०५ | रत्नागिरी ०७.२० वा. | वडोदरा २०.१५ वा. (त्याच दिवशी) | प्रत्येक सोमवार २४ आणि ३१ ऑगस्ट, २०२० |

**थांबे:** भरूच, सुरत, वलसाड, वापी, **वसई रोड**, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड स्थानक

**संरचना:** एसी २-टीयर, एसी ३-टीयर, शयनश्रेणी आणि द्वितीय श्रेणी आसन

### अहमदाबाद ⇌ सावंतवाडी रोड — ४ फेऱ्या

साप्ताहिक दि. २१ ते २९ ऑगस्ट २०२० पर्यंत

| ट्रेन क्र. | प्रस्थान | आगमन | प्रस्थानाचा दिवस आणि दिनांक |
|---|---|---|---|
| ०९४१८ | अहमदाबाद १६.१५ वा. | सावंतवाडी रोड १२.४० वा. (पुढील दिवशी) | प्रत्येक शुक्रवार २१ आणि २८ ऑगस्ट, २०२० |
| ०९४१७ | सावंतवाडी रोड १३.४० वा. | मुंबई सेन्ट्रल ०७.५५ वा. (पुढील दिवशी) | प्रत्येक शनिवार २२ आणि २९ ऑगस्ट, २०२० |

**थांबे:** वडोदरा, सुरत, वापी, **वसई रोड**, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदूर्ग आणि कुडाळ स्थानक

**संरचना:** एसी २-टीयर, एसी ३-टीयर, शयनश्रेणी आणि द्वितीय श्रेणी आसन

ट्रेन क्र. **०९४१६, ०९१०६ आणि ०९४१८** करिता आरक्षण **दि. १७ ऑगस्ट, २०२०** पासून ठरवून दिलेल्या प्रवासी आरक्षण केंद्रे आणि आयआरसीटीसी वेबसाईटवर सुरू होईल.

कृपया नोंद घ्यावी की या ट्रेन्स संपूर्णतः आरक्षित ट्रेन्स म्हणून धावतील. त्यामध्ये अनारक्षित सर्वसाधारण द्वितीय श्रेणी डबे नसतील परंतु फक्त द्वितीय श्रेणी आरक्षित आसन कोच असतील.

विशेष दराने विशेष ट्रेन्स

पश्चिम रेल्वे

www.wr.indianrailways.gov.in

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

सर्व आरक्षित तिकिटांकरिता ओळखीचा पुरावा सोबत आणावा



IIFL WEALTH & ASSET MANAGEMENT

## IIFL WEALTH MANAGEMENT LIMITED

CIN: U74140MH2008PLC177884

Regd. Office: IIFL Centre, Kamala City, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai - 400013, Maharashtra, India.

Tel. +91 22 4876 5600, Fax +91 22 4875 5606 | Email id: secretarial@iiflw.com | Website: www.iiflwealth.com

**Extract of Consolidated Financial Results for the Quarter ended June 30, 2020**

₹ in Lakhs

| Particulars | Quarter ended June 30, 2020 | Quarter ended March 31, 2020 | Quarter ended June 30, 2019 | Year ended March 31, 2020 |
|---|---|---|---|---|
| | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| Total Income from Operations | 34,946.30 | 43,161.92 | 36,121.77 | 1,50,307.88 |
| Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 10,933.52 | 1,416.91 | 9,023.95 | 28,642.11 |
| Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 10,933.52 | 1,416.91 | 9,023.95 | 28,642.11 |
| Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 8,227.14 | (296.13) | 6,155.06 | 20,116.39 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 8,345.26 | (3.42) | 6,089.08 | 20,644.58 |
| Equity Share Capital | 1,743.38 | 1,742.90 | 1,701.80 | 1,742.90 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | 2,97,407.44 |
| Earnings Per Share (of Rs. 2/- each) (for continuing and discontinued operations) | | | | |
| Basic | 9.44 | (0.34) | 7.23 | 23.37 |
| Diluted | 9.34 | (0.34) | 7.03 | 22.83 |

**Notes**

1. The above financial results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board at its meeting held on August 14, 2020.
2. The above is an extract of the detailed format of Quarter ended Financial Results filed with the stock exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarter ended Financial Results are available on the Stock Exchange websites viz. www.bseindia.com and www.nseindia.com and on the Company's website viz. www.iiflwealth.com.
3. The Key data relating to standalone financial results of IIFL Wealth Management Limited is as under :

₹ in Lakhs

| Particulars | Quarter ended June 30, 2020 | Quarter ended March 31, 2020 | Quarter ended June 30, 2019 | Year ended March 31, 2020 |
|---|---|---|---|---|
| | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| Total Income from operations from continuing operations | 3,450.34 | 9,279.16 | 175.81 | 21,625.87 |
| Profit/(Loss) Before Tax from continuing operations | 2,281.66 | 5,645.19 | (2,180.26) | 27,931.23 |
| Profit/(Loss) After Tax from continuing operations | 1,676.18 | 4,288.97 | (1,460.12) | 25,004.76 |
| Profit/(Loss) Before Tax from discontinued operations | - | - | (2,477.95) | (8,502.76) |
| Profit/(Loss) After Tax from discontinued operations | - | - | (1,566.10) | (5,657.18) |
| Total Profit/(Loss) After Tax | 1,676.18 | 4,288.97 | (3,026.22) | 19,347.58 |

By order of the Board
**For IIFL Wealth Management Limited**
sd/-
**Karan Bhagat**
Managing Director
DIN: 03247753

Date : August 14, 2020
Place : Mumbai


# कोरोना संकटकाळात सशक्त बनण्याची संधी

**वार्ताहर**

लासलगाव, दि. १५ - करोनाच्या संकट काळात शासन, प्रशासन आणि नागरिकांचा पुढाकार कौतुकास पात्र आहे. त्यामुळेच कोरोनाचा संकट काळ हा आपणा सर्वांसाठी स्वावलंबी व सशक्त बनण्याची संधी आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्वतंत्र दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी केले. भारतीय स्वातंत्र्याच्या ७३ व्या वर्धापन दिनाचे ध्वजारोहण पालकमंत्री भुजबळ यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडला त्या वेळी ते बोलत होते. आज सर्व भारतीयांच्या उत्साहावर करोनाचे सावट आहे. त्यातुन आपला महाराष्ट्र, आपला जिल्हाही या आपत्तीच्या सावटाखाली आहे. संकट भले कितीही मोठे असो आपण सर्वजण जात, धर्म, प्रांत, लिंगभेद विसरून त्याचा एक दिलाने सामना करु. तसेच देशाला ब्रिटीशांच्या तावडीतून मुक्त करून स्वातंत्र्य मिळवून देण्याचा चंग आपल्या क्रांतीकारकांनी, स्वातंत्र्य सैनिकांनी बांधला होता तसाच संकल्प आज देशाला, राज्याला, जिल्ह्याला कोरोनामुक्त करण्यासाठी आपण आजच्या स्वातंत्र्य दिनी करुया असे आवाहन, राज्याचे अन्न नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांनी केले.

# राज्यात २ हजार २२० कोरोनाबाधित पोलिसांवर उपचार सुरु



**प्रतिनिधी**

मुंबई, शनिवार - राज्यात सध्या २ हजार २२० पोलिसांवर विविध रुग्णालयात उपचार सुरु असून शुक्रवारी ६७ पोलिसांना कोरोनाची लागण झाली तर ७४ पोलीस कोरोनामुक्त झाले आहे. कोरोनामुळे आतापर्यंत १२४ पोलिसांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत राज्यात ११ हजार ९८७ पोलिसांना कोरोनाची लागण झाल्याची नोंद झाली होती, त्यात १ हजार २४७ पोलीस अधिकारी तर १० हजार ७४० पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. शुक्रवारी ६७ पोलिसांचे कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आले. त्यामुळे त्यांना विविध शासकीय आणि खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सध्या राज्यात २ हजार २२० पोलिसांवर उपचार सुरु आहे.

त्यात २७८ पोलीस अधिकारी आणि १ हजार ९४२ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. दिवसभरात ७४ पोलीस कोरोनामुक्त झाले असून आतापर्यंत कोरोनामुक्त झालेल्या पोलिसांची संख्या ९ हजार ६४३ झाली आहे. त्यात ९५८ पोलीस अधिकारी आणि ८ हजार ६८५ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कोरोनामुळे आतापर्यंत १२४ पोलिसांचा मृत्यू झाला आहे. त्यात अकरा पोलीस अधिकारी तर एकशे तेरा पोलीस कर्मचारी आहेत. दुसरीकडे राज्यात आतापर्यंत ३३३ पोलिसांवर जमावाकडून हल्ला झाला असून त्यात ८८८ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. कोविडसंदर्भात आतापर्यंत १ लाख १० हजार १०२ कॉल मुख्य नियंत्रण कक्षाला प्राप्त झाले आहेत. लॉकडाऊननंतर राज्यात १ हजार ३४७ अवैध वाहतूकीचे गुन्हे दाखल झाले असून याच गुन्ह्यांत ३३ हजार ३६० जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ९५ हजार ८२१ वाहने जप्त केले आहेत. त्यांच्याकडून २० कोटी ८१ लाख २७ हजार ४४४ रुपयांचा दंड वसुल केला आहे.